## प्र.3. छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण ①

4.6

मध्ययुगातील बहुतेक सर्व सत्ता या आपल्या राजसत्ता ही धर्मसत्तेसाठी आपल्या धर्माचा प्रचार व प्रसारासाठी वापरत होत्या. मुघल, सिद्दी, आदिलशाही व निजामशहा या इस्लामी सत्ता व पोर्तुगिजांसारखी युरोपियन सत्ता आपली राजसत्ता ही हिंदुस्थानामध्ये आपल्या धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी सर्व शक्तीने जाणीपूर्वक वापरत होत्या. वरील सर्व प्रतिकूल परिस्थितीत छ. शिवाजीराजांनी स्वराज्याची स्थापना केली. समतावादी, मानवतावादी शाक्त धर्माचे अनुसरण केले आणि या धर्मप्रभावातून आपल्या स्वराज्याचे धार्मिक धोरण सर्वधर्मसमभावाचे, जातीविरोधाचे आणि स्त्री-दाक्षिण्याचे ठेवले.

**छ. शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरणाची वैशिष्ट्ये :**

① **स्वधर्म व स्वसंस्कृतीचे रक्षण :**

छ. शिवाजीराजे हे धार्मिक होते. आपल्या धर्माचे अभिमानी होते. स्वधर्म रक्षण हा स्वराज्याचा प्रमुख उद्देश होता. आजपर्यंत येथील धार्मिक संस्कृती उद्ध्वस्त करण्याचा जो प्रयत्न सुरू होता तो थांबविला. तीर्थस्थळे, देवालये व मूर्ती यांचा विध्वंस थांबवला. आपला धर्म व संस्कृतीचे रक्षण करत असताना त्यांनी कोणत्याही धर्मास तोशीस दिली नाही. म्हणून समर्थ रामदास म्हणतात.

> "या भूमंडळाचे ठायी । धर्मरक्षी ऐसा नाही।
> महाराष्ट्र धर्म राहिला काही । तुम्हा कारणे ।।"

② **सर्वधर्मसमभावाची भूमिका :**

सर्व धर्म समान आहेत. सर्व धर्माचा परमात्मा परमेश्वर एक आहे त्याला फक्त वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. उदा. राम, रहिम, येशू इत्यादी सर्वधर्माची मूळ तत्वे चांगलीच आहेत. सर्व धर्मांची तत्त्वे अखिल मानवजातीच्या उद्धाराविषयीचीच आहेत. औरंगजेबाने हिंदू धर्मीयावर जिझिया कर लादला तेव्हा महाराजांनी औरंगजेबाला पत्र लिहून त्याचा निषेध केला.

Scanned by CamScanner

③ सर्वधर्मीय धर्मग्रंथ, प्रार्थना व पवित्र स्थळे यांच्याविषयी आदर :-

इस्लाम धर्मीय राज्यकर्ते हिंदूंची मंदिरे उद्ध्वस्त करत होते. अनेक देवदेवतांच्या मूर्ती फोडत होते. पवित्र स्थळांची जाळपोळ करत होते. तेव्हा महाराजांनी आपल्या स्वराज्यातील मशिदी, दर्गे, पीर यांना अभय दिले होते. आपल्या लष्करात सक्त ताकीद दिली होती. मशिदी, दर्गे व पीर यांची जुनी इनामे चालू ठेवली. व काही ठिकाणी नवी इनामे सुरू केली. युद्ध मोहिमेत अगर रणांगणावर जेव्हा जेव्हा कुराणाची प्रत मिळत असे तेव्हा त्याचे पावित्र जपण्याची सूचना महाराजांनी सर्व सैन्यास दिली होती.

④ मुस्लीम राज्यकर्त्यांशी शत्रुत्व :-

जसा मुस्लीम राज्यकर्त्यांनी येथील लोकांच्यावर धार्मिक स्थळांच्यावर, स्त्रियांच्यावर अन्याय, अत्याचार केले त्याचा सूड उगवण्याचे मुस्लीम लोकांच्यावर, त्यांच्या स्त्रिया व धार्मिक स्थळावर होता आला ~~असता~~ असता पण महाराजांनी तसे केले नाही. शत्रूंच्या स्त्रिया ही हक्काची मालमत्ता मानण्याचा तो काळ होता पण महाराजांनी अत्यंत कठोरपणे स्त्रियांची अब्रु जतन करण्याचा प्रयत्न केला. महाराजांचे परधर्मातील सामान्य लोकांशी, बायका-मुलांशी त्यांचे शत्रुत्व नव्हते. त्यांचे शत्रुत्व हे अन्यायी, अत्याचारी, धर्मांध मुस्लीम राज्यकर्त्यांशी होते.

⑤ बाटलेल्या हिंदूंना पुन्हा हिंदू धर्मात घेतले :-

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचे व क्रांतिकारी कार्य म्हणजे बाटवून जबरदस्तीने मुसलमान केलेल्या हिंदू धर्मियांना त्यांनी पुन्हा धार्मिक विधी करून परत हिंदू धर्मात घेतले. त्यांचे शुद्धीकरण केले. हे सर्व सनातन्यांचा विरोध मोडून काढून केले. ही त्या काळातील क्रांतिकारी धार्मिक व सामाजिक सुधारणाच होती. महाराजांचा धार्मिक धोरणाचा एक पैलू होता.

Scanned by CamScanner

⑥ बहुआयामी इस्लामी धर्म-संस्कृतीचा प्रभाव :-

~~शुद्ध~~ शिवाजी महाराजांच्या घराण्यावर इस्लामच्या तीन पिढ्यांचे सहज संस्कार झालेले होते. महाराजांचे आजोबा मालोजी हे चांभारगोंदे अथवा श्रीगोंदा येथील सुफी संत शेख महंमदाचे भक्त होते. हिंदू-धर्मीयांमध्ये मोठ्या प्रमाणावर ~~सांस्कृ~~ सांस्कृतिक देवाण-घेवाण झाली. मुस्लीम स्त्रियांनी सौभाग्य अलंकार म्हणून गळ्यात मंगळसूत्र व पायात जोडवे वापरण्यास प्रारंभ प्रारंभ केला. पुरुषांनी मुस्लीम पुरुषांचे झब्बे व तंग तुमानी हा पोशाख वापरणे.

⑦ मुस्लिमांना राज्यकारभार व सैन्यात स्थान :-

सन 1650 नंतर आदिलशाही, कुतुबशाही, मोघलशाही या मुस्लीम राज्यवटीतून अनेक मुस्लीम सैनिक महाराजांकडे नोकरीसाठी आले. त्यांना महाराजांनी स्वराज्याच्या कारभारात व सैन्यात विश्वास दाखवून सामावून घेतले. हिरोजी, फर्जंद, मदारी मेहतर यांनी जीवघेणा त्रास व छळवाद सोसला. परंतु आग्र्याहून सुटका करून घेतलेल्या महाराजांविषयी त्यांनी ~~अकिंत~~ यत्किंचितही माहिती दिली नाही. तसेच दरबारात त्यांच्या कर्तृत्वानुसार पदे दिली. आरमाराचा प्रमुख दौलतखान, तोफखान्याचा प्रमुख इब्राहिम होता घोडदळातील सेनापती ~~सहाय्य~~ साहाय्यक सिद्दी हिलाल इत्यादी. त्यांच्या सैन्यात एक तृतीयांश पेक्षा जास्त सैनिक मुस्लीम होते.

⑧ सर्वधर्मीय शोषित-शासित जनतेच्या अन्याय-अत्याचाराच्या विरोधात विद्रोह :-

महाराजांना औरंगजेबच्या तुर्क-मुघल साम्राज्यापासून आपल्या प्रादेशिक राज्याचे वेगळेपण, स्वतंत्र ओळख प्रस्थापित करणे आवश्यक होते. त्यामुळे त्यांचा आदिलशाहीशी असलेला प्रारंभिक

Scanned by CamScanner

संघर्ष तसेच औरंगजेबाशी असलेल्या संघर्ष साम्राज्यवादी मुघल सत्ताविरोधात प्रादेशिक हिंदवी स्वराज्य असा राजकीय संघर्ष करावा लागला. हा धार्मिक संघर्ष नव्हता. हिंदू-मुस्लीम व सर्वधर्मीय शेतकरी, कष्टकरी, दलित जाती-जमातीच्या रयतेवर अन्याय-अत्याचार करीत असत. या बहुजन शोषित-शासित जनतेच्या अन्याय-अत्याचाराविरुद्ध विद्रोह करण्याची ध्येयवादी भूमिका महाराजांनी स्वीकारली.

वास्तविकदृष्ट्या जनकल्याणाचे राज्य चालविणाऱ्या राजाला सर्वांप्रती समभाव आणि उदारता बाळगावी लागते. त्याला जाती, धर्म, वंश या आधारावर अन्याय्य भेदाला समर्थन देणारे पक्षपाती धोरण आणि अपरिहार्यतः घेता येत नाही. त्यांच्या धोरणाची दिशा उपजतच जात-धर्मनिरपेक्ष किंबहुना सर्वधर्मसमभावाच्या मध्यममार्गातून आकाराला येते.

Scanned by CamScanner